## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१२९/२०१०

निशाणी क्र.२५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकुमासाठी प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांचेविरूध्द दाखल केलेला आहे.

**अर्जातील वादीची कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :**

२. दावा मिळकत गट क्र.१९, क्षेत्र ६ हे. ८४ आर, पोट खराब २३ आर, आकार ६ रू. ४४ पैसे मौजे कोंजवडे, ता. पाटण जि. सातारा ही मिळकत आहे (येथून पुढे थोडक्यात **दावा मिळकत** असे संबोधण्यात आले आहे).

३. दावा मिळकत वादी याची वडिलार्जित मालकी हक्काची असून त्यामध्ये त्याचा ८ आणे चा हिस्सा आहे. दावा मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र.१९ ते ३४ यांनी दावा मिळकतीत अनाधिकाराने अतिक्रमण करून घरे बांधलेली आहेत. दाव्याचे काम प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२०, २२, २५, २८, ३१ यांनी संगनमताने दि.२०.०२.२०११ रोजी दावा मिळकतीत दांडगाईने अतिक्रमण करून संडासचे बांधकाम सुरू केले आहे. वादीने त्यास हरकत घेतली असता सदर प्रतिवादींनी बांधकाम करणारच आहे असे म्हणून वादीला शिवीगाळ केली. दाव्याचा अंतीम निकाल लागण्यास बराच वेळ लागणार आहे. त्यामुळे दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांनी इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये यासाठी प्रस्तुतचा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज आहे.

**प्रतिवादी क्र.२०, २२, २५, २६, ३२ यांचे वादीच्या दाव्याला कैफियतीमधील थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे–**

४. प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांनी प्रस्तुत अर्जाला त्यांचे म्हणणे न दिल्याने माझे पुर्वाधिकारी यांनी दि.१४.०३.२०११ रोजी नि.२५ वर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याविना चालवावा असा आदेश केला आहे. परंतु यापैकी काही प्रतिवादी क्र.२०, २२, २५, २६, ३२ यांनी नि.३४ येथे त्यांची कैफियत दिलेली आहे. त्या कैफियतीमधील कथनांचा मी या अर्जाच्या अनुषंगाने विचार केलेला आहे.

५. वादीतर्फे विधीज्ञ श्री पी. के. गायकवाड यांचा युक्तीवाद ऐकून घेतला. प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांचे विधीज्ञ पुकारले असता अनुपस्थित राहील्यामुळे त्यांच्या युक्तीवादाविना प्रस्तुतचा अर्ज आदेशासाठी घेण्यात आला.

६. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे मी कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने आहे का ? | होय. |
| २) | न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे का ? | होय. |
| ३) | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होईल का ? | होय. |
| ४) | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता** –

७. सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्यावरील चर्चेची पुनरावृत्ती

टाळण्यासाठी ते एकत्रीत विचारात घेण्यात आलेले आहेत. वादी व प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांनी दाखल केलेला पुरावा येथून पुढे निशाण क्रमांक व अनुक्रमांकासह उल्लेखीत केलेला आहे. त्यामुळे परत वादी व प्रतिवादींचा पुरावा नमूद करण्याचे येथे टाळले आहे.

८. नि.५ येथे वादीने दावा मिळकतीचा ७/१२ चा उतारा दाखल केला आहे. सदर उता–यानुसार दावा मिळकतीमध्ये वादीचा ८ आणेचा म्हणजेच १/२ हिस्सा असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ कलम १५७ नुसार भुमी अभिलेखातील नोंदी जोपर्यंत खोटया आहेत असे सिध्द होत नाही तोपर्यंत त्या ख–या आहेत असे समजण्याचे गृहीतक आहे. सदरचे गृहीतक खंडनीय आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा ८ आणेचा हिस्सा नाही हे सिध्द करण्यासाठी सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यांची अशीही कथने नाहीत की दावा मिळकतीचे सर्व हिस्सेदारांमध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले आहे.

९. दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नसल्यामुळे व त्यामध्ये वादीचा ८ आणेचा हिस्सा नि.५ वरील ७/१२ उता–यावरून दिसून येत असल्यामुळे वादीस सकृतदर्शनी केस आहे. जर तुर्तातुर्त मनाईचा आदेश केला नाही तर प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ हे दावा मिळकतीत अधिकचे बांधकाम करून वादीच्या हिश्यास नुकसान पोचविण्याची शक्यता नाकारता येणार नाही. प्रस्तुत दाव्याच्या निकालास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे व तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादीचेच न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालीप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.२० ते २३ आणि २५ ते ३४ यांना तुर्तातुर्त मनाई करण्यात येते की, त्यांनी स्वतः, त्यांचे एजंट, त्यांचे नोकर अथवा त्यांच्या मार्फत हक्क सांगणा–या कोणत्याही इसमांमार्फत दावा मिळकतीत येथून पुढे कसलेही बांधकाम दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत करू नये.

३) या अर्जाचा खर्च मूळ दाव्याच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

ठिकाण – पाटण
दिनांक – २६.०७.२०१६

( म. पो. शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पाटण.